# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रसेनोट क्र- ११५** **दिनांक ०८/०४/२०२३**

## ६ वर्षापासुन खुनाचे गुन्हयात पाहिजे असलेल्या २ आरोपीतांना अटक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

तुळींज पोलीस ठाणे हददीत दिनांक २१/१०/२०१८ रोजी रात्रौ गौराईपाडा येथे इसम नामे सुनिल राजेश सहाणी, वय ३६ वर्ष, राह. रुम नं १०६, पहिला माळा बिलालपाडा नाका, दुबे स्कुलच्या बाजुला संतोषभुवन, नालासोपारा पुर्व व दिवाकर राकेश सिंग राह. रुम नं २, लक्ष्मी चाळ, हनुमान मंदिराजवळ, बिलालपाडा तलाव, नालासोपारा पुर्व यांचेत झालेल्या भांडणाचा मनात राग धरुन दिनांक २४/१०/२०१८ रोजी बिलालपाडा तलावाजवळ, संतोषभवन, नालासोपारा पुर्व येथे यातील आरोपीत यांनी आपसात संगणमत करुन सुनिल राजेश सहाणी यास लाकडी दांडक्याने व लाथाबुक्यांनी जबर मारहाण करुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारले म्हणुन आरोपीतांविरुध्द तुळींज पोलीस ठाणे गुन्हा.रजि.नं. ११४६/२०१८ भा.द.वि.सं. कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयात यापुर्वी दिवाकर राकेश सिंग यास अटक करण्यात आली होती. पोलीस स्टेशन व तत्कालीन स्थानिक गुन्हे शाखा यांनी गुन्हयात पाहिजे आरोपी रमेशकुमार कोतवाल सिंग, सुधाकर राकेश सिंग यांचा शोध घेवुनही ते अदयाप पावेतो मिळुन येत नव्हते.

वर नमुद गंभीर गुन्हयातील पाहिजे आरोपीतांचा शोध घेणेबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते. सदर गुन्हयाचा मध्यवर्ती गुन्हे शाखेकडुन समांतर तपास चालु होता. त्याअनुषंगाने गुन्हयातील पाहिजे आरोपी रमेशकुमार कोतवाल सिंग, सुधाकर राकेश सिंग हे गुन्हा घडल्यापासुन गोंडा, उत्तरप्रदेश येथे आपले अस्तित्व लपवुन राहत आहेत व आता ते बिलालपाडा, नालासोपारा पुर्व परिसरात आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी येणार असल्याबाबतची गोपनीय माहिती स.पो.नि. श्री. दत्तात्रय सरक व पो. हवा. राजाराम काळे यांना मिळाली होती. त्यानुसार पो.नि श्री. राहुल राख यांनी एक पथक तयार केले होते. सदर पथकाने त्याचे भेटण्याचे ठिकाणाबाबत माहिती प्राप्त करुन सदर ठिकाणी सापळा कारवाई करुन आरोपी नामे १) रमेशकुमार कोतवाल सिंग, वय ४० वर्ष, २) सुधाकर राकेश सिंग, वय २० वर्ष, दोन्ही रा. रुम नं २, लक्ष्मी चाळ, हनुमान मंदिराजवळ, बिलालपाडा तलाव, नालासोपारा पुर्व यांना दिनांक ०७/०४/२०१३ रोजी शिताफिने ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने त्याच्याकडे तपास करता त्याचा सदर गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांना पुढील तपासकामी तुळींज पोलीस ठाणे यांचे समक्ष हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलीस श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस निरिक्षक श्री. निरीक्षक राहुल राख, स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.हवा. राजाराम काळे, अशपाक मुल्ला,

शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, सुनिल कुडवे, पो. अंम. हनुमंत सुयवंशी तसेच स.फौ. संतोष चव्हाण, नेम. सायबर सेल यांनी केली आहे.



------oooo------